Vol 5 Issue 3 Sept 2015 ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# *Golden Research Thoughts*

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar


Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

# म. फुलेंच्या सत्यशोधक विचारांची प्रासंगिकता





*राजेंद्र धाये*
*सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख, संत रामदास महाविद्यालय, घनसावंगी, जि. जालना.*

**सारांश :**

इ.स. पूर्व ६ व्या शतकात गौतम बुद्धांनी बौद्ध धम्माची स्थापना करून भारतीय जनमाणसात विवेकाधिष्ठ तर्क विचाराच्या बिजारोपणाची पायाभरणी केल्याचे स्पष्ट होते. या विचारधारेतूनच नवसमाज निर्मितीची दारे खुली होण्यास सुरूवात झाली. ही विचारधारा राष्ट्र व समाज विकासासाठी आवश्यक ठरल्यामुळे सम्राट अशोकानेही इ.स. पूर्व तिसऱ्या शतकात याच विचारधारेचा स्विकार करुन समाजाच्या उद्धारासाठी स्वतःचे आयुष्य अर्पण केल्याचे दिसून येते. अज्ञानामध्ये होरपळणाऱ्या समाजाला जोपर्यन्त ज्ञानदृष्टी मिळत नाही, तोपर्यंत आपल्या विचारांच्या कक्षा रूंदावता येत नाहीत. किंबहुना प्रगतीचे शिखर ही पादांक्रात करता येत नाही. सम्राट अशोकाच्या नंतर हा विचार प्रवाह खंडीत होतो की काय अशी शंका भारतीय समाजात निर्माण झाली होती. परंतु पुढे चार्वाक, म. बसवेश्वर, संत तुकाराम, संत कबीर व म.फुले यांनी हा विचार प्रवाह खंडीत होवू न देता या विचारधारेची कास धरली तर भारतीय समाज वैचारिक प्रगती करू शकतो असे प्रतिपादन केले. मनुस्मृती मध्ये विषमतेच्या संहीतेव्दारे माणसाला (अस्पृश्य स्त्री) पशुतुल्य बनवून अस्पृश्य शुद्रातिशुद्र समाजाचे माणूसपण हिरावून घेण्यात आले होते.[१] या विषारी वर्णव्यवस्थेला तडे देण्याचा पहिला प्रयत्न महाराष्ट्रात म. फुलेंनी केला.

**प्रस्तावना :**

कँट नावाचा समाज- शास्त्रज्ञ म्हणतो अज्ञान, स्वार्थ आणि भावना ज्या समाजात व माणसात असते, असा समाज व माणसे प्रगतीपासून कितीतरी दूर फेकले जातात.[२] भारतीय समाजात अज्ञान व स्वार्थ भावना खचून भरलेली आहे. त्यामुळे अज्ञान, स्वार्थ, निरक्षरता मानवाच्या प्रगतीचे दारे बंद करून मानवजातीला पिंजऱ्यात बंद करते. म्हणून म.फुलेंनी शिक्षणाची कास धरली व येथील समाज परंपरेची चिकित्सा केली. या अनुषंगाने म. फुले आपले मत व्यक्त करताना म्हणतात.




" विद्येविना मति गेली मतिविना नीति गेली
नीति विना गती गेली गती विना वित्त गेले
वित्ता विना शुद्र खचले इतके अनर्थ एका अविद्येने केले.
"[३]

म. फुलेंचे विचार शुद्रतिशुद्रांना व स्त्रियांना शिक्षणाचे महत्व पटवून देवून त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणनारे होते. शिक्षण किंवा विद्या घेतल्याशिवाय शुद्रांचा उध्दार होणार नाही. इंग्रजी ज्ञानाशिवाय मनूच्या मताचे खंडण होणार नाही असे त्यांचे मत होते. म्हणून सरकारने सर्वांना सक्तीचे शिक्षण द्यावे, ब्राम्हणांच्या उपयोगी पडणाऱ्या उच्च शिक्षणावर जास्त खर्च न करता शुद्र बहूजनांच्या प्राथमिक शिक्षणावर जास्त खर्च करावा. शेतकऱ्यांकडून शिक्षण कर वसूल केला जातो पण त्यास शिक्षण दिले जात नाही अशी त्यांची रास्त तक्रार होती.[४] पुढे ते सामाजिक कार्यात भाग घेऊन विधवा पुनर्विवाह, बालहत्या प्रतिबंधक गृह, एवढ्यावर न थांबता त्यांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.[५] 'गुलामगिरी' हा ग्रंथ लिहून झाल्यावर जोतीरावांनी सार्वजनिक चळवळीस आरंभ करण्याचा निर्धार केला. ग्रंथ पुरा होण्यापूर्वी जाहीर सभा, पत्रके व पुस्तिका याद्वारे ते आपले विचार व्यक्त करीत होते. आपली चळवळ संघटीत करुन आपला संदेश सर्व ठिकाणी पोचवावा, अशा निर्धाराने व ध्येयाने त्यांनी सत्यशोधक समाज स्थापला. समाजसुधारणेची ही महाराष्ट्रातील पहिली चळवळ.६ म.फुलेंनी सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून महत्वपूर्ण कार्य केले. परंतू त्यांचा सत्यशोधक विचार आज समाजात पाहावयास मिळतो का? म. फुलेंचे सत्यशोधक विचार आजही समाजासाठी अत्यंत महत्वाचे आहेत.

सत्यशोधक समाजाचा विचार सत्यावर आधारीत होता. तर्क व बुद्धीप्रामाण्यवादावर विश्वास होता. सत्यशोधक समाज म्हणजे साध्या माणूसकीलाही पोरके झालेल्या दीन-दुबळ्या जीवांच्या अव्यक्त भावनांचा उद्रेक होता. सत्यशोधक समाज म्हणजे

समतेवर विश्वास घोषीत करणारी महाराष्ट्रातील पहिली चळवळ होती. सत्यशोधक समाजाचा लढा भटशाही, सामाजिक व धार्मिक गुलामगिरीच्या विरोधात होता. सत्यशोधक समाजाची स्थापना वर्णव्यवस्थेचे उच्चाटन करून शुद्रातिशुद्र (बहुजन) समाजाला शिक्षित करणे, माणसाची उच्च-निच्चता जातीऐवजी गुणावर ठरविने व स्त्री-पुरूष समानता प्रस्थापित करून वर्णव्यवस्थेच्या जोखडातून मुक्त करण्यासाठी केल्या गेली.[७]

म. फुलेंनी स्थापण केलेल्या सत्यशोधक समाजाची तत्वे कोणती होती हे अभ्यासणे पण महत्वाचे आहे. मानवतेची बूज राखण्यासाठी त्यांनी स्थापण केलेल्या समाजाची तत्वे पुढीलप्रमाणे होती,

१.सर्व माणसे एकाच देवांची लेकरे आहेत.[८]
२.देव व भक्त यांमध्ये मध्यस्थाची गरज नाही. अंधश्रध्दा, लोकांची धार्मिक गुलामगिरीतून मुक्तता करणे, भटभिक्षूक धर्माचा धाक घालून अडाणी जनतेची जी अधर्माने पिळवणूक करतात त्या अन्यायापासून त्यांची सूटका करणे.
३.जमीनदार व सावकार यांच्या मगरमिठीतून शेतकऱ्यांची सुटका करणे.
४.शिक्षण सर्वांना सहजलभ्य व्हावे व सर्वांनी शिक्षण घ्यावे म्हणून प्रयत्न करणे.[९]

जोतीरावांच्या सत्यशोधक समाजाचा जातिव्यवस्थेवर तसाच चातुर्वण्यावरही विश्वास नव्हता. आवश्यक असे धार्मिक विधी ठेवून मध्यस्थाची उचलबांगडी त्याने केली.[१०] म.फुलेंनी स्थापन केलेल्या समाजाचे सभासदत्व सर्व जातीतील लोकांना मोकळे होते. ब्राम्हण, महार, मांग इ. त्या आरंभी समाजाचे सभासद होते. ज्या ठिकाणी समाजाच्या शाखा स्थापण्यात आल्या तेथे दर आठवडयात सभा होत. पुण्यात सोमवार पेठेत डॉ. गावडे यांच्याकडे सभा होई. तेथे दारुबंदी, सक्तीचे शिक्षण, स्वदेशी वस्तू वापरणे, ब्राम्हणांची पुरोहितगीरी झुगारुन देणे, लग्न अल्प खर्चात करण्याची व्यवस्था करणे, ज्योतिष, भुते, समंध यांच्या भितीपासून लोकांना मुक्त करणे इ. वर चर्चा होई. परमेश्वराचे जनकत्व व मणुष्याचे बंधुत्व यावर भर देण्यात येई.[११]

म. फुलेंनी सत्यशोधक समाजाची सांगीतलेली तत्त्वे, कार्यपद्धती आजच्या परिस्थितीशी ते कसे प्रासंगिक आहेत हे तपासणे गरजेचे आहे.

ईश्वराच्या अस्तित्वाबद्दल समाजामध्ये आस्तिक-नास्तिक अशा दोन्ही बाजू रूढ आहेत. म. फुलेंनी मात्र ईश्वराला निर्मिक निर्गुणाची उपमा दिली आहे.[१२] याचा अर्थ ईश्वराची भक्ती करण्याचा आधिकार स्त्री शुद्रातिशुद्रांपासून ते सवर्ण वर्गांना समान सांगितला आहे. म. फुलेंच्या सत्यशोधक विचारांची आज पदोपदी पायमल्ली होताना दिसून येते. शुद्रातील ईश्वरी आस्तिक वर्गाला मंदिरांची दारे ग्राम पातळीवर कायद्याने बंद नसली तरी त्यांचा मंदिर प्रवेश गावकऱ्यांना पचतो का? याचाही विचार करावा लागेल. म्हणून समाजामध्ये समतेचे वातावरण तयार करावयाचे असेल तर आज खऱ्या अर्थाने म. फुलेंच्या सत्यशोधक विचाराची गरज आहे असे म्हणावे लागेल.

म. फुले म्हणतात की, ईश्वर भक्तीसाठी मध्यस्थाची गरज नाही. परंतु आजचे चित्र पाहिले तेव्हा वाटते की, म.फुलेंच्या विचारांचा समाजाला पूर्णतः विसर पडला आहे. कारण आजही ईश्वर भक्तीसाठी सोवळ्यातील मठाधिपती व मठांचे मोठ्या प्रमाणात अवडंबर माजले आहे. भक्तांना देव दर्शनासाठी मंदीरात कधी - कधी मध्यस्थाला पैसाही द्यावा लागतो. प्रसंगी भक्ताला कधी - कधी तर देवासमोरच धक्काबुक्कीलाही सामोरे जावे लागते. महाराज व साधू बुवांची काही कमतरता राहिली नाही. यांनी आपापल्या भक्तांची संख्या वाढवून आपल्या जीवनाचा आर्थिक स्तर चांगलाच उंचावलेला आहे. यांच्याकडूनही समाजाची मोठ्या प्रमाणावर फसवणूक होते. याला उच्चविद्याविभूषित वर्गही बळी पडतो. महाराज व साधु बुवांचे कारणामे आपल्याला पेपरमधून नेहमीच वाचायला मिळतात. सध्या नाशिक मध्ये सुरू असलेल्या कुंभमेळ्यात पैशांची उधळण करून देवत्व प्रसन्न करण्याची स्पर्धा चालू असल्याचे दिसून येते. राज्यात दुष्काळी परिस्थिती उग्र स्वरुपाची होत असतानाही नाशिक येथे सुरु असलेल्या कुंभमेळ्यात कोट्यावधी रुपयांचा अक्षरशः चुराडा होत आहे तसेच शाही स्नानासाठी फार मोठ्या प्रमाणात पाण्याचा वापर होत आहे. राज्यातील धरणांची पाणी पातळी झपाट्याने कमी होत असून नागरीकांना आणि जनावरांना प्यायला पाणी मिळनेही कठीण होत चालले आहे. अशा परिस्थितीत शाहीस्नानासाठी धरणातील पाण्याचा अतिरिक्त वापर करणे योग्य आहे का? याचाही विचार होणे गरजेचे आहे. तेंव्हा म. फुले यांनी सांगितलेल्या मध्यस्थ विरहीत भक्तीचा मार्ग आज समाजाला मार्गदर्शक वाटतो.

आज समाजातील उच्च विद्याविभूषित वर्ग, देव, धर्मविधी व कर्मकांडात जास्त अडकलेला आहे. विज्ञानवादी विचारांची कास सोडून तो या ढोंगी साधू, कर्मकांडाच्या मागे लागलेला दिसतो. म. फुलेंना अपेक्षित असलेल्या विचारांना त्याने सोडचिठ्ठी दिल्यासारखेच आहे.

जात ही भारतीय समाजाला लागलेली विषारी किड आहे. ही किड समाजाचे अस्तित्व नष्ट करते की काय अशी भिती म. फुलेंच्या मनात निर्माण झालेली होती. जातीने वर्णवर्चस्ववादी ब्राह्मणाला सत्ता व संपत्तीचे पूर्ण अधिकार बहाल करून गुणवत्ता ही ब्राह्मणांची मक्तेदारी ठरवण्याचा घाट घातला होता. परंतु म. फुलेंनी ब्राह्मणाच्या मक्तेदारीला प्रखर विरोध करून समाज परिवर्तनासाठी आधुनिक शिक्षणाचे महत्त्व ओळखून समाजातील सर्व जाती, धर्मातील स्त्री-पुरूषांना शिक्षणाची दारे खुली केली व गुणवत्तेची कास धरली.[१३] म.फुलेंच्या या महत्त्वपूर्ण योगदानामुळेच अस्पृश्य, शुद्रातिशुद्रांनी आपल्या बौद्धिक सामर्थ्यांच्या जोरावर अनेक यशाची शिखरे गाठली. म्हणून जात आणि गुणवत्तेची सांगड घालणाऱ्यांना म. फुलेंच्या सत्यशोधक विचारांचा आदर्श समोर ठेवण्याची गरज आहे.

आजपर्यंतच्या एकूण भारतीय परंपरेत शेतीचा एवढ्या गंभीरपणे कुणी विचारच केला नव्हता. फुल्यांच्या समकालीन सुधारकांनाही कधी शेतीबद्दल, शेतकऱ्यांबद्दल विचार करावा असे वाटले नाही. या देशातील एकूण पंरपराच अशी की, पुस्तकी, शाब्दीक ज्ञानाची ओझी वाहणारे श्रेष्ठ आणि संबंध अर्थव्यवस्थेचा कणा वाहणारा कष्टकरी समाज मात्र उपेक्षित! अप्रतिष्ठीत!!

महात्मा फुल्यांनी शेतकरी-कष्टकरी हा प्रतिष्ठीत असला पाहिजे आणि शेती ही उत्तम केली पाहिजे. या दृष्टीने प्रथमतःच विचार मांडले. आपले आजूबाजूस अफाट पसरलेल्या जनसमुदायाकडे सहानुभूतीने पाहण्याची दृष्टी महात्मा फुल्यांनी प्रथमतःच दिली, हे कोणालाही मान्यच करावे लागेल. ग्रामीण जनता, तिचे प्रश्न, त्यांची दुःखे यांना प्रथमतःच वाचा फुटली ती महात्मा फुल्यांच्या रुपानेच.[१४] परंतु आजही शेतकऱ्यांची अवस्था फारशी बदललेली दिसत नाही. आजही त्याला प्रतिष्ठा मिळाली काय? याचा विचार करावा लागेल.

म. फुलेंच्या काळात जमीनदार व सावकाराकडून शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात शोषण होत होते. फुल्यांनी शेतकऱ्यांना समाज  व राष्ट्राचा पोशिंदा संबोधले होते. एवढेच नव्हे तर शेतकरी हा समाज व राष्ट्राचा तारणहार असल्याचे स्पष्ट केले आहे.[१५] हे सत्य असले तरी तो नैसर्गिक व मानवनिर्मित अरिष्ठांच्या चक्रव्यूहात गटांगळ्या खात आहे. सरकार शेतकऱ्यांच्या दुःखावर तात्पूरती मलमपट्टी करून सहानुभूतीच्या ढोंगाचे राजकारण करत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मूळ समस्या मात्र बाजूला राहत आहेत. म्हणून शेतकरी सुखी व समृद्ध होण्यासाठी आज समाजाला केवळ म. फुलेंच्या विचारा शिवाय पर्याय नाही असेच म्हणावे लागेल.

आज जग २१ व्या शतकात वाटचाल करीत आहे. तंत्रज्ञानाने झपाट्याने प्रगती साधलेली आम्हास दिसत आहे. असे असले तरी आमच्या देशातील शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर उंचावलेला दिसत नाही. त्याच्या आत्महत्येवरुन तो खालावेलाच दिसतो. सततची अवर्षणे, आर्थिक मंदी, जागतीक बाजारपेठेतील शेतीमालाच्या भावाची धसरण, शासनकर्त्यांची भूमिका इ. समस्या त्याच्यासमोर उभ्या आहेत.

ज्या मनुस्मृतीने ब्राह्मण पुरोहितांना धर्मसत्तेचे सर्व अधिकार देवून शुद्रातिशुद्रांचा शोषणाचा मार्ग मोकळा करून दिला. अस्पृश्य शुद्र धर्मभोळ्या समाजा समोर धर्म उत्सोवाचे स्तोम माजवून मोठ्या प्रमाणात शोषण करण्यात येत होते.[१६] हे चित्र वर्तमान समाजातही फारसे वेगळे दिसून येत नाही. आजही शुभकार्याची सुरूवात करावयाची असेल तर त्यासाठी ब्राह्मणालाच (पुरोहीत) निमंत्रण ठरलेले असते. त्यांच्या हातून पुजा-अर्चा केली तर यशस्वी होते अशी भावना आजही धर्मभोळ्या अस्पृश्यांची आहे.[१७] या धार्मिकतेच्या माध्यमातून अस्पृश्य शुद्रांचे शोषण केले जात आहे. या शोषणाला छेद द्यावयाचा असेल तर म. फुलेंनी आपल्या सार्वजनिक सत्य धर्माच्या माध्यमातून मानवी समतेचा पुरस्कार केला होता. समता असेल तरच समाजात व राष्ट्रांत शांतता टिकून राहू शकते.[१८] परंतु आजचा विरोधाभास असा आहे की, अर्थ व राजकारणात शुद्रातिशुद्र, आदिवाशी, सामान्य वर्गाला आजही अंधश्रध्दा, सामाजिक प्रश्न, विषमता या विरोधात लढणाऱ्या परिवर्तनवादी चळवळीतील कार्यकर्त्यांना, धमक्या दिल्या जातात. प्रसंगी आपले प्राणही गमवावे लागताना दिसतात. (उदा. नरेंद्र दाभोळकर, गोविंद पानसरे, कलबुर्गी) म्हणूनच या सर्व प्रश्नांना सामोरे जाताना आम्हाला आजही म.फुल्यांच्या सत्यशोधक विचारांचा विचार करावा लागेल, त्यांच्या या विचारांची पाऊले आम्हाला उचलावी लागतील, आणि  विषमतेचा मार्ग सोडून समतेच्या मार्गावर मार्गस्थ व्हावे लागेल. असे केले तर कदाचीत म.फुलेंचे विचार समाजात रुजतील, अशी अपेक्षा करणे गैर नाही.

धर्मविषयक विचार मांडताना फुल्यांनी हिंदू धर्मव्यवस्थेतील गुणदोषांना मोठ्या प्रमाणावर जबाबदार असलेल्या ब्राह्मणांवर जी तिखट टीका केली आहे, ती आपण नजरेआड करु शकत नाही....... विशिष्टि व्यक्ती ब्राह्मण जातीतील आहेत, एवढ्याच कारणासाठी फुल्यांनी त्यांच्यावर ही टीका केलेली नाही. धर्माचा दुरुपयोग करणाऱ्या ब्राह्मणांवर त्यांनी प्रहार केला, परंतु न्यायाच्या बाजूने येणारांविषयी आत्मियता दाखविली. त्यामूळे त्यांच्या टिकेतील 'ब्राह्मण' हा शब्द पाहून आजच्या ब्राह्मण व्यक्तींनी बिचकून जाण्याचे वा ती टीका आपल्यावर ओढवून घेण्याचे कारण नाही. तथापि आपण सांस्कृतिक अहंकाराच्या बाजूने उभे राहणार की न्यायाच्या बाजूने उभे राहणार, याचा निर्णय विवेकपूर्ण घेण्याची मात्र आवश्यकता आहे. ज्यांना त्यांची टिका झोंबते, त्यांनी त्या टिकेच्या जोडीने मनुस्मृतीसारखे धर्मग्रंथ वाचण्याची आणि त्याआधारे त्यांची टिका न्याय्य आहे की अन्याय्य आहे, याचा तटस्थपणे निर्णय घेण्याचीही आवश्यकता आहे. पूर्वी ज्यांनी शोषण केले, त्यांच्या वंशजाचे आता शोषण करावे वा त्यांच्यावर अन्याय करावा अशी सुडाची भावना फुल्यांच्या मनात अजिबात नव्हती, याचीही दखल घेतली पाहिजे.[१९]

थोडक्यात येवढेच म्हणावे लागेल की, म. फुलेंनी सत्यशोधक समाजाच्या स्थापनेतून हक्क व अधिकारांचे सार्वजनिकीकरण करुन सर्वांना समानतेच्या पायवाटेवर एका रेषेत उभे करण्याचा प्रयत्न केला. एवढेच नव्हे तर गुणवत्ता व प्रतिष्ठा सर्वांसाठीच समान असून ती प्राप्त करण्याचा अधिकार सर्वांनाच आहे, आणि ती प्राप्त करता आली पाहीजे असे म. फुलेंनी सांगीतले. धार्मीक गुलामगीरीचा पगडा, दैववादात बुडालेली सामान्य जनता, धर्माच्या नावावर अवडंबर माजवून जनसामान्यांची लूट करणारे, आणि पाताळयंत्री विरोधक अशा विचित्र व धोकादायक परिस्थितीतही म.फुलेंनी सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून सामाजीक पुनर्रचनेचे कार्य केले, ही तत्कालीन परिस्थितीत एक सामाजिक क्रांतीच होती.

आज मात्र म.फुलेंच्या सत्यशोधक विचारांची गरज असतानाही या विचारांकडे समाज दूर्लक्ष करतो आहे. आजचा उच्चशिक्षीत वर्गही धार्मिक अवडंबर, कर्मकांड, पूजाविधी आणि बुवाबाजी या निरर्थक बाबींमध्ये अडकला आहे. वैज्ञानिक युगातही तो यामध्ये अडकला याचेच आश्चर्य वाटते. सत्यशोधन सत्य सांगणाऱ्या व्यक्तींना आज प्रसंगी आपले प्राणही गमवावे लागत आहेत. त्यामूळे आजच्या या सर्व परिस्थितीत म. फुलेंचे सत्यशोधक समाजाचे हे समतेचे विचारच समाजाला आणि पर्यायाने देशाला योग्य दिशा देऊ शकतील असे वाटते.

## संदर्भ

१.य.दि. फडके (संपा), महात्मा फुले संग्रह वाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, पाचवी आवृत्ती, २८ नोव्हे १९९९, पृ.क्र. १३.

२.M,. कोठेकर शांता, इतिहास : तंत्र आणि तत्त्वज्ञान, साईनाथ प्रकाशन, नागपूर, तिसरी आवृत्ती, १५ फेब्रु २०११, पृ.क्र. १६९.

३.फडके य.दि., (संपा), म. फुले समग्र वाङ्मय, उपरोक्त, पृ.क्र. २५३.
४.नरके हरी (संपादक), महात्मा फुले : शोधाच्या नव्या वाटा, M,. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतीराव फुले आणि राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समीती, महाराष्ट्र शासन मुंबई, पाचवी आवृत्ती २००६, पृ.क्र. ६४.
५.फडके य.दी. (संपा), म. फुले समग्र वाङ्मय, उपरोक्त, पृ.क्र. १६५.
६.तर्कतिर्थ जोशी लक्ष्मणशास्त्री, जोतिचरित्र, नॅशनल, बुक ट्रस्ट इंडिया, दिल्ली, चौथी आवृत्ती, २००४, पृ.क्र. २४.
७.फडके य.दी. (संपा.), म.फुले समग्र वाङ्मय, उपरोक्त, पृ.क्र. १५.
८.तर्कतिर्थ जोशी लक्ष्मणशास्त्री, उपरोक्त, पृ.क्र. २५.
९.नरके हरी (संपादक), महात्मा फुले : साहित्य आणि चळवळ, M,. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आणि राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समीती, महाराष्ट्र शासन मुंबई, प्रथमावृत्ती २००६, पृ.क्र. २०७.
१०.तर्कतिर्थ जोशी लक्ष्मणशास्त्री, उपरोक्त, पृ.क्र. २५.
११.कित्ता,
१२.फडके य.दी. (संपा.), महात्मा फुले समग्र वाङ्मय, उपरोक्त पृ.क्र. २२.
१३.कित्ता, पृ.क्र. ३०६.
१४.नरके हरी (संपादक), महात्मा फुले : साहित्य आणि चळवळ, उपरोक्त, पृ.क्र. ३७०-३७१.
१५.साळुंके पी.बी., माळी (संपा.), महात्मा फुले गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, मुंबई जुलै १९८२, पृ.क्र. ५५०.
१६.M,. रानडे गो. मो., महात्मा ज्योतिबा फुले, मंगल प्रकाशन बजाजनगर, द्वितिय आवृत्ती १९९१, पृ.क्र. ३०.
१७.कित्ता, पृ.क्र. ५२.
१८.साळूंके पी.बी., माळी (संपा.), महात्मा फुले गौरव ग्रंथ, उपरोक्त, पृ.क्र. ५६३.
१९.नरके हरी (संपा.), महात्मा फुले : शोधाच्या नव्या वाटा, उपरोक्त, पृ.क्र. ६६.



*राजेंद्र धाये*
*सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख, संत रामदास महाविद्यालय, घनसावंगी, जि. जालना.*

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org